“कृषी उत्पादनाच्या साठवणुकीसाठी गोदामाची कार्यपद्धती व नियामक यंत्रणा यांचा अभ्यास-विशेष संदर्भ लातूर जिल्हा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य **विद्याशाखेतील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)** पदवीसाठी

सादर करावयाचा शोध आराखडा

संशोधक

श्री.राहुल व्यंकटराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ. डी. बी. कोनाळे

सहयोगी प्राध्यापक

वाणिज्य विभाग,शिवाजी महाविद्यालय उदगीर

: संशोधन केंद्र:

शिवाजी महाविद्यालय,उदगीर जि. लातूर

मार्च २०२२

अनुक्रमणिका

अ.क्र.	शीर्षक	पृष्ठ क्र.
	मुखपृष्ठ	01
	अनुक्रमणिका	02
1	प्रस्तावना	03
2	संशोधन साहित्याचा आढावा	04
3	संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहितके	06
4	संशोधन पद्धती	06
5	संशोधनाचे महत्त्व	08
6	अध्याय रूपरेखा	09
	संदर्भ ग्रंथ सूची	09

1) प्रस्तावना

भारत हे 138 दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेले एक मोठे कृषीप्रधान राष्ट्र आहे आणि गेल्या दशकात आर्थिक विकास दर ४ ते ९टक्के पर्यंत बदलला आहे. आर्थिक विकासात योगदान **देणा-यांपैकी** एक म्हणजे कृषी क्षेत्र होय. सन २०२० ते २०२१ मध्ये भारतातील कृषी क्षेत्रातील वाटा हा १९.९% इतका आहे. भारतातील कृषी उत्पादनांचा मोठा भाग विशेषतः अन्नधान्य हंगामी बदलांनुसार बदलतो. या उत्पादनाचा वापर एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी हंगामाच्या पलीकडे वाढतो.शेतीतील माल हे योग्य साठवणूक व व्यवस्था नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात खराब होत असतो. याच कारणामुळे गोदामामध्ये साठवणूक केल्यामुळे हे दुष्परिणाम कमी करता येऊ शकतात यामध्ये विशेषता अन्नधान्य, कडधान्ये, बियाणे, मिरची, हळद, लोणचे, गूळ, साखर, दुधाची पूड, कापसाच्या गाठी, सोयाबीन, बियाणे आणि खते, कृषी अवजारे इत्यादी या उत्पादनांच्या अनेक आवश्यक वस्तूंचा साठा करणे आवश्यक आहे जेणेकरून त्यांचा लोकांना आणि उद्योगांना नियमित पुरवठा होईल. या आवश्यकतांसह गोदाम पुरवठा साखळी जोडणी मुख्य घटक बनली आहे.

गोदाम हि वस्तूच्या साठवणुकीसाठी एक शास्त्रीय सुविधा आहे. ज्यात व्यवस्थित आणि सुव्यवस्थित पद्धतीने परीणामात्मक आणि गुणात्मक दृष्टिने वस्तूची योग्य देखभाल आणि जतन करणे व आवश्यकतेनुसार ठेवीदारांना ते उपलब्ध करून देणे समाविष्ट आहे.

महाराष्ट्रामध्ये गोदामाची सुरुवात सन १९५७ मध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची स्थापना झाल्यानंतर महामंडळाने भाडयाची गोदामे घेऊन, त्यामध्ये साठवणुकीचा व्यवसाय सुरू केला. महामंडळाने गोदाम बांधकाम कार्यक्रम हाती घेऊन, १९६१-६२ मध्ये स्वमालकीच्या दोन गोदामांमधून २,७२० मेट्रिक टनाची साठवणूक क्षमता निर्माण केली. तेव्हापासून महाराष्ट्रात विविध ठिकाणी महामंडळाने व्यवसायानुरूप साठवणूक क्षमतेचे गोदाम बांधकाम हाती घेऊन महाराष्ट्रात स्वमालकीच्या गोदामांची सोय केली. आजमितीस एकूण १९३ ठिकाणी महामंडळाच्या वखारकेंद्राचे जाळे असून स्वमालकीच्या एकूण ८३० गोदामांमधून, १३ लाख ५० हजार मेट्रिक टन मालाची साठवणूक करता येते. सदर १७४ वखारकेंद्रावरील कामकाजाचे नियंत्रण आठ विभागीय कार्यालये-औरंगाबाद,

अमरावती, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, लातूर, पुणे, कोल्हापूर यांच्या मार्फत होते.

2) <u>संशोधन साहित्याचा आढावा :-</u>

या विषयावर यापूर्वी अनेक संशोधकानी संशोधन केलेले आहे. त्यापैकी काही संशोधकांनी केलेल्या संशोधन कार्याचा आढावा खालील प्रमाणे आहे.

1. Dr. BRAMHANKAR E. B. (1968)“THE PROBLEMS OF WAREHOUSING AGRICULTURAL PRODUCTS WITH SPECIAL REFERENCE TO THE WAREHOUSING CORPORATION IN INDIA” ब्रह्माकार इ. ब. (१९६८) यांनी आपल्या संशोधनामध्ये शेती उत्पादन साठवणुकी संबंधी केंद्रीय भांडार व राज्य भांडार यामध्ये कशा प्रकारे मालाची साठवणूक केली जाते व त्यामध्ये कोणत्या समस्या येतात, बँकिंग आणि गोदाम **पद्धती** हे पूरक उपक्रम आहेत, बँकांद्वारे थेट प्रगतीमध्ये बरेच काम आणि **जबाबदा-या यांचा** समावेश आहे व तसेच दोषांची शक्यता कमी करण्यासाठी प्रभावी पर्यवेक्षण आणि नियंत्रणाची गरजही त्यांना वाटली आणि कॉर्पोरेशन **अधिका-यांकडून** तपासणी करून पर्यवेक्षण आणि नियंत्रणाची वकिली केली. अशा प्रकारच्या समस्याचे अध्ययन केलेले आहे .

2. दत्त व सुंदरम (१९९२) भारतीय अर्थव्यवस्था, यांनी आपल्या पुस्तकामध्ये विक्री व्यवस्थेतील दोष कमी करण्यासाठी अनेक उपाय सुचविले आहेत, भारतातील बहुसंख्यांक लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबून आहे त्यामुळे शेतमालाला योग्य किंमत प्राप्त व्हावी मात्र ति बाजार समित्याकडून मिळत नाही. हंगामाच्या काळात शेतमालाच्या किंमती मोठया प्रमाणात कमी केल्या जातात. किंमती ठरेपर्यंत शेतकार्‍यांकडे थांबण्याची क्षमता नसते यावर उपाय करण्यासाठी योग्य आणि पुरेशा प्रमाणात गोदामांची सुविधा निर्माण करून दिल्या. वाहतूक सुविधा कमी करण्यात यावी यासाठी पुरेशी साधने आणि योग्य प्रकारचे रस्ते अस्तित्वात यावेत खेड्यातील सावकाराकडून होणारी मालाची खरेदी थांबवली जावी शेतमालाच्या किंमतीत चढउतार झाले तरी उत्पादन खर्चाचा विचार केला जावा. बाजारामध्ये दलालांची संख्या माफक असावी त्यावर शासनाचे योग्य नियंत्रण असावे.

3. PRASHANT SURGONDA PATIL (2012) “A STUDY OF REGULATORY MECHANISM AND FUNCTIONING OF

WAREHOUSES FOR AGRICULTURAL PRODUCE IN SOUTH-WESTERN MAHARASHTRA"Ph.D. Thesis PUNE UNIVERSITY.
प.स. पाटील (२०१२) यांनी कोल्हापूर ,सातारा आणि सांगली जिल्ह्यातील गोदामाचे **अध्ययन** केलेले आहे. व यामध्ये त्यांनी शेतकरी व ठेवीदार यांच्या मालाची गोदाम व्यवस्थापकाकडून कशा प्रकारे कायदेशीर नियमन व नियंत्रण करण्यात येते व यामुळे त्या विभागामध्ये **येणा-या** समस्या व त्यावर उपाययोजना कशा केल्या जावेत व त्याच बरोबर ठेविदारांचे समाधान **कसे** होईल हे सांगितलेले आहे.

4. डॉ. गिरीधर पाटील (२०१४) दैनिक लोकसत्ता मधील लेख. यांनी बाजार समित्यांनी लादलेल्या महागाई संपादकीय लेखामध्ये शेतमाल किंमत आणि उपभोकत्ता खरेदी किंमती बाबत विश्लेषण केलेले आहे. औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातील उत्पादनाच्या किंमती या उत्पादक ठरवीत असतो मात्र शेतमालाच्या बाबत याचा प्रत्यय येत नाही . बाजार समित्याचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे खुल्या बाजारामध्ये स्पर्धाभिमुखता असावी लागते. कृषी बाजार सामित्यामध्ये काही बाजार सम्राट आणि राजकारणी एकत्र येवून अभेद युक्ती तयार केलेली आहे. शेतकरी शेतमाल उचांक गाठत असताना शेतीमालाला किंमत मात्र योग्य प्रमाणात मिळत नाही.

5. Vivian Fernandes (2019) Agricultural growth needs warehousing reforms यांनी आपल्या **लेखामध्ये** वस्तूंच्या कमी किमती, लाभहीन होल्डिंग्ज आणि किंमती कमी ठेवण्याचे ग्राहक-केंद्रित धोरण याशिवाय, ज्या शेतक-यानी देशाला अन्न सुरक्षित बनवले आहे ते स्वतः आर्थिकदृष्ट्या असुरक्षित आहेत कारण उत्पादन बाजार कर्ज बाजारपेठांपासून वेगळे नाहीत. शेतकरी मधेस्त विक्रेता किंवा कमिशन एजंटांकडून कर्ज घेतात जे त्यांना विक्रीसाठी भाग पाडतात आणि कापणीनंतर धान्याच्या किमती या कमी असतात म्हणून त्या कमी किमतीला विकले जातात.

6. How To Improve The Warehouse Receiving Process **Newcastle Systems**, on Wed, Jun 09, 2021 Article या लेखामध्ये आजच्या गोदाम पद्धतीमध्ये अधिग्रहणात वस्तूंच्या मालकीचे हस्तांतरण समाविष्ट असते, ज्यात त्याच्या स्वभावानुसार आर्थिक दायित्व समाविष्ट असते. दस्तऐवजीकरण अचूक आणि सहजतेने आणि कार्यक्षम असल्याची खात्री

करून सामग्री ग्राहकांना शक्य तितक्या लवकर उपलब्ध करण्याची अनुमती देते. जे प्राप्त झाले आहे त्याचा अचूक अहवाल लेखा आणि वस्तूंच्या देयकावर थेट परिणाम करतो.

वरील संशोधनासाठी पुनरावलोकन हे वेगवेगळ्या पुस्तके, नियतकालिके, मासिके, शासकीय अहवाल, प्रकाशने, नाबार्ड अहवाल यांच्या माध्यमातून घेण्यात आलेले आहे.

3) संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहितके

i) संशोधनाची उद्दिष्टे

1. लातूर जिल्ह्यातील कृषी उत्पादनाच्या गोदामाचे अध्ययन करणे
2. कृषी उत्पादन साठवनुकीसाठी गोदाम नियामक यंत्रणा यांचा अभ्यास करणे.
3. लातूर जिल्ह्यातील कृषी उत्पादन साठवनुकीसाठी गोदामाची कार्यपद्धती अभ्यासणे.
4. कृषी उत्पादन साठवनुकीसाठी गोदामांच्या समस्या अभ्यासणे.
5. लातूर जिल्ह्यातील कृषी विकासात गोदामांचे योगदान अभ्यासणे.

ii) संशोधनाची गृहितके

1. **उत्पादनाच्या तुलनेत लातूर जिल्ह्यामध्ये गोदामे कमी आहेत.**
2. **गोदाम नियामक यंत्रणा रचनात्मक रीतीने कार्य करते.**
3. **अभ्यास क्षेत्रामध्ये गोदाम साठवणूक क्षमता कमी आहे.**
4. **विविध माल ठेवीदारांना मिळणा-या सेवेबाबत समाधानाची पातळी एक समान आहे.**
5. **कृषी विकासात गोदामे महत्वाची भूमिका बजावतात.**

4) संशोधन पद्धती

या विषयावर संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीचा वापर करणार आहे. प्राथमिक व दुय्यम माहितीच्या आधारे विविध तक्ते, आलेख, विभाजित वर्तुळे यांच्या आधारे सांख्यिकीय पद्धतीने व वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण करणार आहे.

i) **<u>प्राथमिक माहिती</u>**

प्रत्यक्ष गोदामामध्ये जाऊन ठेवीदार व गोदामामध्ये कार्यरत **असणा-या** व्यक्तीशी प्रत्यक्ष मुलाखती

ii) **<u>दुय्यम माहिती</u>**

दुय्यम माहिती हि वेगवेगळे पुस्तके , नियतकालिके , मासिके, शासकीय अहवाल, प्रकाशने, नाबार्ड अहवाल यांच्या माध्यमातून घेण्यात आलेली आहे.

प्रस्तूत विषयाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील लातूर जिल्याची निवड करण्यात आलेली आहे कारण हा जिल्हा दोन राज्यांच्या सिमेवर वसलेला आहे व येथील बाजारपेठ हिदाळी आणि सोयाबीनच्या प्रक्रियेसाठी आशिया खंडातील प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखली जाते.

लातूरजिल्यातील १० तालुक्यामध्ये असलेल्याएकूण 184 गोदामापैकी प्रत्येक तालुक्यातील ३०% इतकी संख्या हि संशोधनासाठी घेण्यात येणार आहे त्यामध्ये शासकीय, सहकारी, खाजगी, ए.पी.एम.सी (**कृ**.उ.बा.स)गोदामांचा आभ्यासकरण्यात येणार आहे .

iii) **नमुना आराखडा**

गोदामांचे प्रकार	लातूर जिल्यातील गोदामांची तालुक्यानिहाय संशोधनासाठी घेण्यात आलेली संख्या									
	लातूर	**उदगीर**	**अहमदपूर**	**चाकूर**	**औसा**	**रेणापूर**	**जळकोट**	**निलंगा**	**शिरूर अनतपाळ**	**देवणी**
महा.राज्य व. महा.	2	1	1	1	1	1	1	1	1	1
सहकारी	1	1	1	1	1	1	0	0	0	0
खाजगी	10	5	2	2	2	2	2	1	1	1
ए.पी.एम.सी (क्र.उ.बा.स.)	2	1	1	1	1	1	1	1	0	1
एकूण	15	8	5	5	5	5	4	3	2	3

5) संशोधनाचे महत्व :-

1. शेतकरी समुदायाच्या व **ठेवीदारांच्या** गरजा पूर्ण करण्यासाठी गोदाम उद्योगाचे कायदे आणि नियमन हे प्राथमिक उद्दिष्ट आहे की गोदाम एक चांगली आणि व्यवस्थित प्रणाली सुनिश्चित करते.
2. **शास्त्रोक्त पध्दतीने गोदामामध्ये अन्नधान्य साठविले जात नसल्याने अन्नधान्याची नासधुस मोठा प्रमाणावर होत आहे. त्यामुळे राष्ट्रीय संपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.**
3. **शेतकरी आपले घरातच, खळ्यावर धान्य ठेवत असल्याने उंदीर, पक्षी, किड यांच्यापासून धान्याचे नुकसान होते. तसेच मालाचा दर्जा कायम राहत नाही. त्यामुळे किंमत मिळत नाही.**
4. या अगोदरच्या संशोधकांनी संशोधन हे वेगवेगळ्या क्षेत्रावर केलेले आहेत व लातूर **जिल्हयावर** कोणीही केलेले नाही, मुळात लातूर जिल्ह्यातील बाजारपेठ हि खूप मोठी आहे त्यामुळेच हे संशोधन गरजेचे आहे .

<u>संशोधनाचा कालखंड</u>

या संशोधनासाठी कालावधी हा वर्ष (२०१२ -२०१३ ते २०२१ - २०२२) १० वर्ष इतका घेण्यात आलेला आहे.

<u>संशोधनाच्या मर्यादा</u>

वरील संशोधन हे लातूर **जिल्हयापुरते** मर्यादित आहे, यामध्ये सर्व 10 **तालुकानिहाय** अध्ययन केले जाणार आहे.

6) <u>अध्याय रूपरेखा</u>:-

अ.क्र.	कार्य	वर्ष
1	व्याप्ती निश्चित करणे आणि समस्या ओळखणे	1 **वर्ष**
2	**संशोधन साहित्याचा आढावा**	
3	**संशोधन आराखडा आणि नमुना निवड**	2 **वर्ष**
4	**तथ्यांचे संकलन, विश्लेषण आणि सारणीकरण**	
5	**शोधप्रबंधाचा मसुदा तयार करणे**	3 **वर्ष**
6	**शोधप्रबंध लेखन आणि विद्यापीठास सादर करणे**	

1. प्रस्तावना
2. **संशोधन साहित्याचा आढावा**
3. संशोधन पध्दती
4. **संकलित माहितीचे विश्लेषण**
5. **निष्कर्ष व शिफारशी**
संदर्भसूची

7) संदर्भ सूची

1. DR. BRAMHANKAR E. B. (1968)“THE PROBLEMS OF WAREHOUSING AGRICULTURAL PRODUCTS WITH SPECIAL REFERENCE TO THE WAREHOUSING CORPORATION IN INDIA”
2. PRASHANT SURGONDA PATIL (2012) “A STUDY OF REGULATORY MECHANISM AND FUNCTIONING OF WAREHOUSES FOR AGRICULTURAL PRODUCE IN SOUTH-WESTERN MAHARASHTRA”Ph.D. Thesis PUNE UNIVERSITY.
3. How To Improve The Warehouse Receiving Process **Newcastle Systems**, on Wed, Jun 09, 2021 Article
4. Vivian Fernandes (2019) Agricultural growth needs warehousing reforms article.
5. Datt and Sundaram [1992] Indian Economy, S. Chand and company, new Delhi P.no.468 & 469
6. **डॉ.गंगाधर पाटील** 2014 **भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, चैतन्य प्रकाशन नाशिक** पा. नं. **243, 247**

संशोधन मार्गदर्शक
डॉ. डी. बी. कोनाळे

संशोधक
श्री.राहुल व्यंकटराव